आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
७ जून २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ
- येत्या २१ जूनला होणाऱ्या नीट यूजी फेरपरीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा एनटीएनं फेटाळला, अफवांवर विश्वास न ठेवण्याचं आवाहन
- दक्षिण कोरियाच्या पुढच्या प्रधानमंत्री म्हणून हान सेओंग सूक राष्ट्रपतिंकडून नामनिर्देशित
- उलानबातर कुस्ती स्पर्धेत भारताच्या दीपकनं ६१ किलो वजनी गटात तर दिनेशनं १२५ किलो वजनी गटात पटकावलं सुवर्णपदक

**आणि**

- अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यावर भारताची पकड

**<><><><><>**

स्वयंपाकासाठीच्या घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. १४ किलोच्या सिलिंडरच्या दरातली ही वाढ आजपासून लागू होणार आहे. गेल्या तीन महिन्यातली ही दुसरी दरवाढ आहे. या वाढीमुळे दिल्लीत घरगुती एलपीजी सिलिंडरचे दर ९१३ वरून ९४२ रुपये झाले आहेत. तर मुंबईत सिलिंडरचे दर ९१२ रुपये ५० पैशांवरून ९४१ रुपये ५० पैसे इतके झाले आहेत.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय स्तरावर स्वयंपाकाच्या गॅसच्या दरात मोठी वाढ होत असली तरी भारतात एलपीजी सिलेंडर जागतिक स्तरावर सर्वात कमी दरात मिळत असल्याचं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया यांसारख्या विकसित अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारतात एलपीजी स्वस्त आहे, असं केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे. जागतिक ऊर्जा बाजारातल्या अस्थिरतेपासून ग्राहकांचं संरक्षण करण्यासाठी सरकारनं स्वतः वाढीव किमतीचा मोठा वाटा उचलला आहे, असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

येत्या २१ जूनला होणाऱ्या नीट यूजी २०२६ च्या फेरपरीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा एनटीए, अर्थात राष्ट्रीय चाचणी संस्थेनं फेटाळला आहे. विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांमधल्या परीक्षेबाबतच्या तणावाचा गैफायदा घेऊन अशा अफवा पसरवणाऱ्या संघटित टोळ्यांचं हे काम असल्याचं एनटीए नं समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे. परीक्षा प्रक्रियेची विश्वासार्हता अबाधित असून, उमेदवारांना सुरक्षित आणि निष्पक्ष पद्धतीनं परीक्षा देता यावी, यासाठीच्या उपाययोजना करण्यात आल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या यंदाच्या १२वी च्या परीक्षेसाठी निकाल-पश्चात सेवा पुरवणाऱ्या पोर्टलवर आढळून आलेल्या त्रुटींची पडताळणी आणि प्रश्नपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. हे पोर्टल आज मध्यरात्रीपर्यंत खुलं राहणार असून, विद्यार्थ्यांनी मुदत संपण्यापूर्वी आपले अर्ज पूर्ण करून सादर करावेत, असं सीबीएसई नं समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये म्हटलं आहे.

<><><><><>

दक्षिण कोरियाचे राष्ट्रपती ली जे म्युंग यांनी लघु आणि मध्यम उद्योग विभागाच्या मंत्री हान सेओंग सूक यांना देशाच्या पुढच्या प्रधानमंत्री म्हणून नामनिर्देशित केलं आहे. दक्षिण कोरियाला कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात नेण्यासाठी आणि सर्वसमावेशक आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी हान या अत्यंत योग्य असल्याचं राष्ट्रपतिंचे मुख्य सचिव कांग हून सिक यांनी म्हटलं आहे.

दक्षिण कोरियाच्या संसदेनं या नियुक्तीला मंजुरी दिली तर हान या दक्षिण कोरियाच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री ठरतील.

<><><><><>

मंगोलियात उलानबातर खुल्या कुस्ती स्पर्धेत भारतीय कुस्तीपटूंनी आज पुरुषांच्या फ्रीस्टाईल प्रकारात दोन सुवर्ण आणि दोन कांस्य पदकं जिंकली. अंतिम लढतीत दीपकनं ६१ किलो वजनी गटात कझाकस्तानच्या असिल आयताकिन याचा ६-० असा पराभव केला. तर दिनेशनं १२५ किलो वजनी गटात कझाकस्तानच्या येदिगे कासिमबेकवर २-० नं मात केली.

६५ किलो वजनी गटात मोहित कुमारनं कझाकस्तानच्याच ओसिमझान दास्तानबेक याच्यावर १७-६ असा दणदणीत विजय मिळवत कांस्य पदक निश्चित केलं. तर ९७ किलो वजनी गटात विकीनं मंगोलियाच्या गानखुयाग गानबतार याला ४-० नं नमवत कांस्य पदक पटकावलं.

<><><><><>

न्यू चंदिगड इथं सुरु असलेल्या अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी क्रिकेट सामन्यावर भारतानं आज दुसऱ्या दिवशी पकड घेतली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतानं कालच्या ३ बाद ३६८ धावसंख्येवरुन आज पुढं खेळायला सुरुवात केल्यानंतर शतकवीर कर्णधार शुभमन गिल १२६ धावांवर बाद झाला. ऋषभ पंतनं ८१, तर वॉशिंग्टन सुंदरनं नाबाद ५२ धावा केल्या. ८ बाद ५६४, अशी धावसंख्या झाल्यावर भारतान आपला डाव घोषित केला. अफगाणिस्तानतर्फे महंमद सलीमनं ६ गडी बाद केले.

त्यानंतर फलंदाजीसाठी उतरलेल्या अफिगानस्ताननं दिवसअखेर पहिल्या डावात ५ बाद ११३ धावा केल्या. म्हणजेच ते अद्याप ४५१ धावांनी पिछाडीवर आहेत. आजचा खेळ थांबला तेव्हा  रहमत शाह ४३, तर अफसर जझाई ३ धावांवर खेळत होता. भारतातर्फे आज मानव सुतारनं ३, तर प्रसिद्ध कृष्णानं २ बळी घेतले.

<><><><><>

परीक्षा आणि प्रवेश परीक्षांमध्ये होत असलेल्या कथित अनियमितता आणि पेपरफुटीची जबाबदारी घेऊन केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान त्यांच्या पदाचा राजीनामा देईपर्यंत आपलं आंदोलन चालूच राहील असं कॉकरोच जनता पक्षाचे संस्थापक अभिजित दीपके यांनी म्हटलं आहे. ते आज छत्रपती संभाजी नगर इथं बातमीदारांशी बोलत होते. आपल्या पक्षाच्या नेतृत्त्वाखाली काल नवी दिल्लीत केलेल्या निदर्शनात सुमारे ७ हजार लोक सहभागी झाले होते, आणि हे आंदोलन यशस्वी झालं, असं ते म्हणाले. हे आंदोलन लवकरच देशव्यापी करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पावसाचं राज्यात आगमन झालं असलं तरी १५ जूनपर्यंत राज्यात मान्सूनच्या प्रगतीचा वेग मंद राहील,  त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये असं आवाहन कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागानं केलं आहे. नैऋत्य मोसमी पाऊस दक्षिण

कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांच्या काही भागांत ९ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर १५ जूनपर्यंत पावसाच्या प्रगतीचा वेग कमी राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनीही आज नागपुरात बातमीदारांशी बोलताना याबाबत माहिती दिली. यंदाचं वर्ष हे अलनिनोचं वर्ष असून शेतकऱ्यांना दुबार पेरणीची वेळ येऊ नये यासाठी माहिती देण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं...

**- - होल्ड.. बाईट - मुख्यमंत्री - -**

**<><><><><>**

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविणारं पश्चिम बंगाल हे देशातलं ३६ वं राज्य ठरणार आहे. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी उद्या राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण आणि पश्चिम बंगाल राज्य सरकार यांच्यात सामंजस्य करार करण्यात येणार आहे.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांचा मिलिटरी जेंडर ॲडव्होकेट ऑफ द इयर हा पुरस्कार मिळाल्याबद्दल प्रधानमंत्री मोदी यांनी मेजर अभिलाषा बराक यांचं अभिनंदन केलं आहे. हा सन्मान मेजर बराक यांची उत्कृष्ट सेवा आणि संयुक्त राष्ट्रांच्या शांतता रक्षक मोहिमेतल्या भारताच्या दीर्घकालीन योगदानाचा गौरव करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत आणि इंडोनेशिया यांच्यातल्या संयुक्त आयोगाची आठवी बैठक आज नवी दिल्लीत झाली. परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर आणि इंडोनेशियाचे परराष्ट्रमंत्री सुगिओनो यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा झाली. दोन्ही नेत्यांनी प्रादेशिक आणि परस्पर हिताच्या जागतिक घडामोडींविषयी चर्चा केली. तसंच विभागीय आणि बहुपक्षीय व्यासपीठांवर सहकार्य आणि समन्वय वृद्धिंगत करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला.

**<><><><><>**

महसूल गुप्तचर संचालनालयानं, मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर राबवलेल्या ऑपरेशन गोल्डन नेक्सस अंतर्गत सोन्याच्या तस्करीच्या मोठ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. या कारवाईत सुमारे ५ कोटी रुपये किमतीचं ३ किलो २०० ग्रॅम परदेशी सोनं जप्त केलं असून सात जणांना अटक केली आहे. त्यात बांगलादेश आणि श्रीलंकेतले तीन प्रवासी, विमानतळावरचे तीन कर्मचारी, आणि सोनं स्विकारणारी व्यक्ती यांचा समावेश आहे.

<><><><><>

जूनच्या पहिल्या आठवड्यात परदेशी गुंतवणूकदारांनी सुमारे ४२ हजार ९२७ कोटी रुपयांचे समभाग विकले आहेत. पश्चिम आशियातला तणाव हे या विक्रीमागचं मुख्य कारण आहे. या भू-राजकीय अनिश्चिततेचा गुंतवणूकदारांच्या मानसिकतेवर मोठा परिणाम झाला असून उर्जेच्या अस्थिर किमती आणि पुरवठा साखळीतला दीर्घकालीन व्यत्यय यांबाबतच्या वाढत्या भीतीमुळे हे गुंतवणूकदार जोखीम उचलायला कचरत आहेत.

//<><><><><>//